पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २४ मे २०२५

# विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची प्लास्टिकविरोधी मोहीम

**कोल्हापूर :** विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक विरोधी मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत प्लास्टिकचा राक्षस करा बाटलीत बंद! एकल वापर प्लास्टिक संकलन हा उपक्रमाचा उद्देश आहे. एकल वापर प्लास्टिक हे पर्यावरणास खूप घातक ठरत आहे. कारण ते पुनर्वापर करता येत नाही, तसेच पुनर्चक्रीकरणही करणे दुरापास्त असते. मग ते गटारे - प्रवाह तुंबणे, प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, समुद्रतळाशी जाऊन तेथील जैवविविधता धोक्यात आणणे हे दुष्परिणाम घडवून आणतात. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण विभागामार्फत उपक्रम हाती घेतला आहे. ६०० विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेऊन २०० किलो प्लास्टिक संकलित केले. उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विभागप्रमुख प्रा. एस. एस. भोसले यांचे सहकार्य लाभले.